९६३१५

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य ,पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला ,पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी -: sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/अभिलेख धारीका क्र ४/तालुका-प्रभाग/झोपु/सनिअआदेश/ ३२९९ /२०१८ दि.१०/०५/२०१८

**वाचावे** : १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१
२. शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३
३. महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ अधिसूचना दिनांक ११ सप्टेंबर २०१४
४. महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ नियम २(८), २(२०) व ३(i)
५. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, झोपुप्रा, पुणे यांचे जा.क्र.झोपुप्रा/ता.स.नि.अ./घो/क.बाबत/ ७५१/२०१८, दि.०२.०५.२०१८
६. शासन राजपत्र क्र अप्रदा-११७/प्र.क्र.१३६/१३-स दि.१२.०१.२०१८

## - आदेश –

ज्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या दि.१३/०८/२०१३ च्या) सुधारणा (अधिनियमातील कलम ७३ कब नुसार, राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणा मार्फत घेण्याची तरतुद आहे, आणि,

ज्याअर्थी, शासन अधिसूचना दिनांक ३०/०३/२०१३ अन्वये राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाचे गठण करण्यात आले आहे, आणि ,

ज्याअर्थी,उपरोक्त सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचे संदर्भिय पत्रासोबत जोडलेले संदर्भ क्रमांक ६ चे शासन राजपत्र क्र अप्रदा-११७/प्र.क्र.१३६/ १३-स दि.१२.०१.२०१८ ने पुणे महानगरपालिका क्षेत्र व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टी पुनर्वसन साठीचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे येथे निर्माण केलेले सहाय्यक निबंधक सहकारी संस्था या पदास उक्त राजपत्रात नमूद कार्यक्षेत्रासाठी निबंधकाचे अधिकार प्रदान केलेले आहेत. आणि,

ज्याअर्थी , महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ दिनांक ११/०९/२०१४ अन्वये अधिसूचीत करण्यात आलेले आहेत, आणि सदर नियमातील तरतुदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी नियम क्र.२(२०) नुसार तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी यांची व्याख्या करण्यात आलेली आहे. त्यानुसार सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ,झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांना त्यांचे वैधानिक अधिकार क्षेत्रात तालुका/प्रभाग सहकारी निवडणूक अधिकारी म्हणून घोषित करणे आवश्यक आहे, आणि

त्याअर्थी, सहकारी संस्थांच्या निवडणुका घेणेसाठी राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब व महाराष्ट्र सहकारी संस्था निवडणूक नियम २०१४ नियम २(२०) नुसार खालील प्रमाणे स्तंभ ३ मधील अधिकारी यांना स्तंभ ४ मधील त्यांचे वैधानिक अधिकार क्षेत्रातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूकांसाठी तालुका/प्रभाग सहकारी निवडणुक अधिकारी म्हणून घोषित करणेत येत आहे.

| अ.क्र. | जिल्हा | अधिकारी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | पुणे | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था , झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे | झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचे अधिनस्त पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील झोपडपट्टी अथवा झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रापुरते मर्यादित |

**मा.आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांचे निर्देशानुसार**

१०|०५|१८

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य,पुणे-१ सत्यमेव जयते

**प्रति,**

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था ,झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

**प्रत माहितीस्तव :**

१. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

२. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

**प्रत माहितीस्तव सस्नेह रवाना :**

१. मा.सचिव, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

२. मा.सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

३. मा.आयुक्त (साखर), साखर संचालनालय, साखर संकुल, पुणे

४. मा.आयुक्त (दुग्धविकास), अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सी-फेस , वरळी मुंबई ४०० ०१८.

५. मा.संचालक, हातमाग, यंत्रमाग व वस्त्रोद्योग, नागपूर.

६. सचिव, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे